MHNS160021622024

<u>**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५२६/२०२४ चे निशाणी क्र.१ खालील आदेश**</u>

**वडनेर भैरव पो.स्टेशन वि. कैलास चंद्रभान वाघ**

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ अन्वये दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदाराच्या मालकीची कृषी उत्पादने म्हणजेच ४२ लाकडी बल्ल्या, १६ लोखंडी पाईप, २ क्वींटल लोखंडी तार वडनेर भैरव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गु.र.क्र. २३५/२०२३ मध्ये जप्त करतण्यात आलेले आहेत.

२. अर्जदाराने पुढे कथन केले आहे की, या सर्व जप्त केलेल्या वस्तु अर्जदाराच्या मालकीच्या असून त्या अर्जदाराला त्यांच्या शेतीकामासाठी गरजेच्या आहेत व त्या वस्तु तशाच पो.स्टेशनमध्ये पडून राहिल्यास गंजून खराब होतील व त्यामुळे अर्जदाराचे नुकसान होणार आहे. त्यामुळे वर नमुद केलेल्या व गु.र.क्र. २३५/२०२३ मध्ये वडनेर भैरव पो.स्टेशनने जप्त केलेल्या वस्तुंचा अंतरिम ताबा अर्जदाराला देण्याची विनंती अर्जदाराने सदर अर्जाद्वारे केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जाला अभियोग पक्षाने व तपासी अंमलदाराने त्यांचे म्हणणे निशाणी ५ कडे दाखल केलेले आहे व त्यामध्ये कथन केले आहे की, अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही वस्तु सदर गुन्हयामध्ये जप्त केलेल्या नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विंनती तपासी अंमलदार व सरकारी वकीलांनी केलेली आहे.

४. अर्जदाराचा अर्ज व त्यावरील सरकारी वकील व तपासी अंमलदाराचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराने जरी त्यांच्या अर्जामध्ये वडनेर भैरव पो.स्टेशनने गु.र.क्र. २३५/२०२३ मध्ये अर्जात नमुद केलेल्या वस्तु जप्त केल्याचे कथन केले असले तरी तपासी अंमलदार व सरकारी वकीलांच्या म्हणण्यानुसार अशा प्रकारचा कोणताही मुद्देमाल सदर गुन्हयामध्ये हस्तगत केलेला नाही.

५. तपासी अंमलदार व सरकारी वकीलांच्या म्हणण्यानुसार अशा प्रकारचा कोणताही मुद्देमाल या गुन्हयामध्ये पोलिसांनी जप्त केलेला नाही, त्यामुळे असा मुद्देमाल पोलिसांनी त्या गुन्हयामध्ये जप्त केलेला आहे हे सिद्ध करण्याची पूर्णतः जबाबदारी अर्जदाराची आहे. मात्र ते सिद्ध करण्यासाठी अर्जदाराने कोणताही सबळ पुरावा अभिपटलावर दाखल केलेला नाही.

६. तपासी अंमलदाराच्या म्हणण्यानुसा सदर गुन्हयामध्ये असा कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही. असे असतांना केवळ अर्जदाराने अर्जात कथन केले आहे, म्हणून सदरचा अर्ज कायद्यानुसार मंजूर करता येणार नाही.

अर्जदाराने त्यांच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वडनेर भैरव पो.स्टेशनने गु.र.क्र. २३५/२०२३ मध्ये प्रस्तुत अर्जात नमुद केलेल्या वस्तु जप्त केल्याचे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदाराने अर्जात नमुद केलेला कोणताही मुद्देमाल तपासी अंमलदाराच्या म्हणण्यानुसार त्या गुन्हयामध्ये जप्त नसल्यामुळे तो अर्जदाराला परत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने अर्जदार त्याने अर्जात नमुद केलेल्या वस्तुंचा अंतरिम ताबा मिळण्यास पात्र ठरत नाही. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदरचे प्रकरण वरील आदेशानुसार बंद करण्यात येते.

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.08.01 18:13:51 +0530

(वृषाली दी. सुंगारे)

ठिकाण – चांदवड　　　　प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर,

दिनांक – ०१.०८.२०२६.　　　　चादंवड.

## <u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***एस. आर. हटकर,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क.स्तर, चांदवड. |
| आदेशाची तारीख | :– | ०१/०८/२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ०१/०८/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :– | ०१/०८/२०२६ |